# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

PH: 2264 1150, 2264 1151, 22620601, 22690602, 22621726(P) FAX:22692102

**Telegram : Edutech** **E-Mail : desk16@dte.org.in** **Internet : http://www.dte.org.in**


**तात्काळ**
**कालमर्यादीत**

क्र.१६/आस्था/वि.प.ठ./२०१२/३९
दिनांक : ७/३/२०१२

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक/ औरंगाबाद / अमरावती / नागपूर

विषय : विधानसभा ठराव क्र.२९४

महोदय,

उपरोक्त विषयाचे शासनाचे क्र. विपठ २०११/(६२/१२)/तांशि-७, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, दिनांक ६ मार्च २०१२ चे पत्र सहपत्रांसह सोबत जोडत आहे.

सदर विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, सदर ठरावाच्या अनुषंगाने माहिती शासनास तात्काळ सादर करावयाची आहे त्यानुसार आपल्या विभागाशी संबंधित माहिती या संचालनालयास दिनांक ९ मार्च २०१२ पर्यंत फॅक्स किंवा ई-मेल द्वारे तात्काळ पाठविण्यांत यावी.

**( दयानंद मेश्राम )**
**सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

पृ.पत्र क्र.विकाऔ/**आस्था-१**/२०१२/७५९८
दिनांक :- 12 MAR 2012

प्रति,
**प्राचार्य,**
शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय, औरंगाबाद
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
**प्राचार्य,** शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर
**उपसचिव,** महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

उपरोक्त विधानसभा ठराव क्रमांक - २९४ अन्वये आपल्या संस्थेतील संबंधित माहिती **त्वरीत (आजच)** या कार्यालयास मेल /फॅक्स व्दारे सादर करण्यात यावी. सुलभ संदर्भासाठी शासन पत्र जोडण्यात येत आहे.

**सोबत : वरीलप्रमाणे**

( महेश शिवणकर )
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

/ फॅक्स द्वारे

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : विपठ २०११/(६२/१२)/तांशि ५
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
**मुंबई ४०० ००१.**
**दिनांक : ६-३-२०१२.**

प्रति,
संचालक
तंत्र शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
**मुंबई ४०० ००१.**

**विषय :- विधान सभा ठराव क्र. २९४,**

**संदर्भ :- महिला व बाल विकास विभागाचे पत्र क्र. विसठ-२०१२/प्र.क्र.५१/का-२ दि.२९.२.२०१२**

**महोदय,**

उपरोक्त विषयावरील महिला व बाल विकास विभागाचे संदर्भांकित पत्र सोबत पाठविण्यात येत आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने या विभागाची माहिती आजच महिला व बाल विकास विभागास उपलब्ध करुन दयावयाचे असल्याने या बाबतची माहिती आजच खास दुतामार्फत शासनास सादर करण्यात यावी, ही विनंती.

**सहपत्र : वरीलप्रमाणे.**

आपला
(स्वाक्षरी) ६/३/२०१२
**(ज. म. अंबादे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

का. ३ ७६
(स्वाक्षरी) ७.३.१२

दि. ७/३/२०१२ रोजी वेळ. ५.१० प्राप्त झाले.



D:\year 2011\ashwasan\letter.doc

<u>महाराष्ट्र शासन</u>

<u>कृपया तात्काळ</u>
समय मर्यादा

क्रमांक :-विसठ-०३१२/प्र.क्र.३/समन्वय
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ५ मार्च,२०१२.

प्रति,

सहसचिव /उपसचिव
(मशि /व्यशि/तंत्र/विशि/आस्था),
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय:-विधानसभा ठराव क्र.२९४.

संदर्भ:-१) महिला व बालविकास विभागाचे पत्र क्र.विसठ-२०१२/प्र.क्र.५१/का.७, दि.२९ फेब्रुवारी,२०१२.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे पत्र क्र.६९७७/फ, दि.२७ फेब्रुवारी,२०१२.

महोदय /महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार पाठविलेला विधानसभा ठराव क्र.२९४ सोबत पाठवित आहे. सदर ठरावाबाबतची माहिती कोणत्याही परिस्थितीत दि.७ मार्च,२०१२ पर्यंत पाठविण्यात यावी, अशी विनंती आहे. सदर बाब विधानमंडळाशी संबंधित असल्याने माहिती वेळेवर पाठविण्याची दक्षता घ्यावी.

Shri. Ambale
Urgent

(शैला तिरगे पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

C:\ASSEMBLYLT CR NO.3_12 THARAV 294.lwp

महाराष्ट्र शासन

फॅक्सव्दारे
विधानमंडळ कामकाज प्राथम्य

क्र.विसठ-२०१२/प्र.क्र.५१/का-२,
महिला व बाल विकास विभाग,
नवीन प्रशासन भवन, ३रा माळा,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २९ फेब्रुवारी, २०१२.

दुरध्वनी क्र.०२२-२२८१४९०६/२२८२४९६६
फॅक्स नं.०२२-२२८२८२८१/२२८१४९०६

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन : तांत्रिकी-2
दिनांक : 9/3/12
आवक क्रमांक : 1360

प्रति,
मा.अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव,
शालेय शिक्षण विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय :- विधानसभा ठराव.

महोदय,

उपरोक्त विषयावरील प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई यांच्या दिनांक २७.२.२०१२ च्या पत्राची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे.

२. सदर पत्रान्वये श्री.सुरेश लाड, वि.स.स. यांनी मांडलेला ठराव खालीलप्रमाणे विभागास पाठविलेला आहे.

"राज्यात अनाथ, निराधार, परित्यक्त्या, घटस्फोटीता विधवा, अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या आपदग्रसत व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांचा समाजात होणारा शारिरिक, मानसिक व सामाजिक छळ थांबवून त्यांची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नती होण्याच्या दृष्टीने महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखून त्यांची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

३. सदर ठराव मा.अध्यक्षांनी विधानसभेत मांडण्यासाठी स्विकृत केला आहे, ही बाब विचारात घेता, सदर ठरावाच्या अनुषंगाने आपल्या विभागामार्फत अनाथ, निराधार, परित्यक्त्या, घटस्फोटीता विधवा, अनैतिकतेतून मातृत्व लाभलेल्या आपदग्रसत व शिक्षणाचा अभाव असणाऱ्या महिलांच्या संदर्भात त्यांची शैक्षणिक उन्नती होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आलेल्या असल्यास, त्याबाबतच्या माहितीची टिप्पणी या विभागास कृपया ७ दिवसांत पाठवावी, ही विनंती.

आपला,

( जयंत जनबंधु )
कक्ष अधिकारी

सहपत्र :- वरीलप्रमाणे

My Document/L.G./Year2012/Tharao/C.R.51

3/3/12